RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

**वर्ष ११, अंक १४२]** **गुरुवार, नोव्हेंबर १३, २०२५/कार्तिक २२, शके १९४७** **[पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००**

**असाधारण क्रमांक ४९७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**विधि व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १० नोव्हेंबर २०२५

**अधिसूचना**

**संदर्भ** :-(१) शासन अधिसूचना क्र. एफएमसी-१११६/प्र.क्र.२२२/का.९, दिनांक २४ सप्टेंबर २०२०.

(२) मा. उच्च न्यायालयाचे पत्र क्र. बी (डब्ल्यु) अे-६८०४/१९९२/१९७३/३७१८१, दिनांक ३ सप्टेंबर २०२५.

**कौटुंबिक न्यायालय अधिनियम, १९८४.**

क्रमांक एफएमसी ११२५/प्र.क्र.१३०/का.९.—ज्याअर्थी, कौटुंबिक न्यायालय अधिनियम, १९८४ ( १९८४ चा ६६ ) च्या कलम ३ मधील पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून आणि यासंबंधी आतापर्यंत काढण्यात आलेल्या सर्व शासकीय अधिसूचना, ज्या कौटुंबिक न्यायालय, यवतमाळ यांचे न्यायालयाशी जेथवर संबंधित असतील तेथवर त्यामध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासनाने, मुंबई येथील उच्च न्यायालयाशी विचार विनिमय करून शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक एफएमसी-१११६/प्र.क्र.२२२/का.९, दिनांक २४ सप्टेंबर, २०२० रोजी (यात यापुढे जिचा उल्लेख, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) यवतमाळ येथे एक कौटुंबिक न्यायालय स्थापन केले आहे ;

ज्याअर्थी, सदर न्यायालयाच्या अधिकारीतेच्या स्थानिक मर्यादा यवतमाळ नगरपरिषद क्षेत्राच्या मर्यादेशी समकक्ष आहेत ;

आणि ज्याअर्थी, यवतमाळ येथील कौटुंबिक न्यायालयाचे अधिकारक्षेत्र, हे यवतमाळ नगरपरिषदेसह उर्वरित यवतमाळ तालुक्याच्या व यवतमाळ तालुक्याला लागून असलेल्या जवळच्या राळेगाव, कळंब, बाभुळगाव आणि नेर या तालुक्याच्या संपूर्ण क्षेत्राच्या स्थानिक सीमांपर्यंत आणखी वाढविणे इष्ट आहे असे शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, कौटुंबिक न्यायालय अधिनियम, १९८४ (१९८४ चा ६६) याच्या कलम ३ ची पोट-कलमे (१) व (२) यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई

उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून, यवतमाळ कौटुंबिक न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राच्या स्थानिक मर्यादा, यवतमाळ नगरपरिषदेसह उर्वरित यवतमाळ तालुक्याच्या व यवतमाळ तालुक्याला लागून असलेल्या जवळच्या राळेगाव, कळंब, बाभुळगाव आणि नेर या तालुक्याच्या संपूर्ण क्षेत्राच्या स्थानिक क्षेत्रापर्यंत वाढवित आहे व विनिर्दिष्ट करीत आहे, आणि त्या प्रयोजनासाठी याद्वारे उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेमध्ये "अ) या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादा यवतमाळ नगरपरिषद क्षेत्राच्या मर्यादेशी समकक्ष असतील." या वाक्याऐवजी खालील (अ) आणि त्यानंतर (ब) व (क) या बाबीं अंतर्भूत करण्यात येत आहे.

(अ) कौटुंबिक न्यायालय अधिनियम, १९८४ च्या कलम ७(१) नुसार, फौजदारी दंड संहितेच्या कलम १२५ (आता भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १४४) अंतर्गत बाबी वगळून, दिवाणी बाबींसाठी यवतमाळ कौटुंबिक न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादा यवतमाळ नगरपरिषद क्षेत्राच्या मर्यादेशी समकक्ष असतील ;

(ब) या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादा यवतमाळ नगरपरिषदेसह यवतमाळ तालुक्याच्या संपूर्ण स्थानिक सीमांतर्गत क्षेत्राशी समकक्ष असतील ;

(क) या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादा यवतमाळ तालुक्याला लागून असलेल्या जवळच्या राळेगाव, कळंब, बाभुळगाव आणि नेर या तालुक्याच्या संपूर्ण स्थानिक सीमांतर्गत क्षेत्राशी समकक्ष असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सागर ज. बोंद्रे,**
उप विधि सल्लागार-नि-उप सचिव.

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032, dated 10th November 2025.

*NOTIFICATION*

*Reference* : (1) Government Notification No. FMC-1116/C.R.222/D-IX, Dated 24th September 2020.

(2) High Court letter No.B(W) A.6804/1992/1973/37181, Dated 3rd September 2025.

THE FAMILY COURTS ACT, 1984.

No.FMC-1125/C.R.130/Desk-IX.—Whereas, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of Section 3 of the Family Courts Act, 1984 (66 of 1984), and in exercise of all powers conferred in this behalf and in so far as they relate to the Court of Family Court, Yavatmal, the Government of Maharashtra, in consultation with the High Court, Bombay, has established a Family Court at Yavatmal by Government Notification, Law and Justice Department, No. FMC-1116/P.Kr.222/Ka.9, dated the 24th September, 2020 (hereinafter referred to as the “said Notification”) ;

Whereas, the local limits of the jurisdiction of the Family Court at Yavatmal are equivalent to the limits of the area of Municipal Council, Yavatmal ;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient further to extend the jurisdiction of the Family Court at Yavatmal to the local limits the rest of Yavatmal Taluka including the area of Municipal Council, Yavatmal and the entire area of the adjacent Talukas of Ralegaon, Kalamb, Babhulgaon and Ner ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of Section 3 of the Family Courts Act, 1984 (66 of 1984), and all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra, in consultation with the Bombay High Court, hereby extends and specifies the local limits of the jurisdiction of Family Court, Yavatmal, to the entire local area of the remaining Yavatmal Taluka including the Municipal Council, Yavatmal and the adjoining Talukas of Ralegaon, Kalamb, Babhulgaon and Ner, and for that purpose hereby amends the said notification as follows, namely :–

In the said notification, instead of the sentence “a) The area within the local limits of the Municipal Council of Yavatmal, for the purpose of exercising the jurisdiction and powers conferred by the said Act,”, the following entries (**a**) and thereafter (**b**) and (**c**) are hereby inserted, namely :–

(**a**) The area within the local limits of the Municipal Council of Yavatmal, for the purpose of exercising the jurisdiction and powers conferred by the Family Courts Act, for Civil matters as per Section 7(**1**) of the Family Courts Act, 1984, excluding matters under Section 125 of Cr. P. C. (Now Section 144 of Bharatiya Nagari Suraksha Sanhita, 2023 ;

(**b**) The area within the local limits of the entire Taluka of Yavatmal including the Municipal Council, Yavatmal ;

(**c**) The local limits of the jurisdiction of this Court shall be coterminous with the entire area within the local limits of the talukas of Ralegaon, Kalamb, Babhulgaon and Ner adjoining Yavatmal taluka.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SAGAR J. BONDRE,
Deputy Legal Advisor-*cum*-Deputy Secretary.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.